*नि.फौ.ख.क्र.३४/२०२४*
*निशाणी क्र.२१*

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – विनोद जनार्दन टेंबुलकर वय – ५४ वर्षे,
व्यवसाय – शेती
रा. – टेंबवली, ता. देवगड

**<u>शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.</u>**

०१. दि.२८/०७/२०२४ रोजी मला पोलिसांनी कोठेही बोलवले नव्हते. सदर दिवशी माझ्या समक्ष काहीही झालेले नव्हते. त्या दिवशी आमचे फोटो वगैरे काही काढले नव्हते. माझ्या समक्ष कोणतीही लिखापढी झाली नव्हती. आता मला दि.२८/०७/२०२४ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही नाही.

*<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर.</u>*

०२. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला घटनास्थळाचा पंचनामा करण्या करिता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळावरुन एक लाकडी फळीचा तुकडा जप्त केला होता. आता मला छायाचित्र दाखविण्यात आले. त्यामध्ये मी आहे. छायाचित्रात माझ्या हातात लाल रंगाचे काहीतरी दिसत आहे. सदर छायाचित्रात मी काय करत आहे हे मला कळत नाही. सदर फोटोत पोलीस व इतर लोक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सागर हा माझ्या गावचा असून माझे त्याच्या सोबत चांगले संबंध आहेत.. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याला शिक्षा होऊ नये असे मला वाटते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आज मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपी क्र. १ ते ३ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ए.एम. माणगावकर यांचे मार्फत.</u>**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि.३०/०६/२०२६